# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### ता.वसई, जि. पालघर

जा.क्र. वविशम/साप्रवि/८३८/२०२०
दिनांक :- १४/०२/२०२०

## जाहिर दरपत्रक

याद्वारे सर्व चामडी बॅगा विक्रेते, पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक (बजेट) मंजुरीबाबत घेण्यात येणा-या मा. महासभेसाठी खालील साहित्य तपशिलात नमुद केलेल्या चामड्याच्या बॅगा खरेदी करावयाच्या असुन त्याकरीता दि.२५/०२/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| १. | ओरीजनल लेदर बॅग (लेडीज बॅग) | १२ X १४ इंच बॅग | प्रती नग |

### अटी-शर्ती

१. पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर जी.एस.टी. क्रमांक असणे बंधनकारक राहील.

२. मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.

३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालय विरार येथील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थीत राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५. दरपत्रकात नमुद वस्तुंचे/ साहित्यांचे दर हे सादर करताना सर्व करासहित व वाहतूक खर्चासहित दर दर्शविण्यात यावेत.

६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार मा. अति आयुक्त यांना राहील.

७. वरील अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

८. यासंबधीची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातुन दि. २५/०२/२०२० रोजी दु. २.०० वाजता मुख्य कार्यालय विरार येथील आवक-जावक विभागामध्ये सादर करावीत.

९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.२५/ ०२/ २०२० रोजी दुपारी ३.३० वाजता मा. अति आयुक्त यांचे दालनात उपस्थीत दरपत्रकादार अथवा त्यांचे प्रतिनीधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ :- मुख्य कार्यालय विरार
दिनांक :- १४/०२/२०२०

अति.आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner